# गौरव प्रकाशन

RNI NO. MAHMAR/210/35320 | संपादक : बंडूकुमार धवणे | Postal Reg. No. ATI/RNP/259/2022-2024

वर्ष १४ ◆ अंक ४६ ◆ अमरावती ◆ दि. १४ ते २० मार्च २०२४ ◆ पृष्ठ ४ ◆ किंमत २ ₹ ◆ Email: gauravprakashan1@gmail.com


# मनपाच्या चार पटीहून अधिक मालमत्ता कर वसुलीतून अमरावतीकरांना मोठा दिलासा

## मुंबईत झालेल्या बैठकीत उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांनी काढला तोडगा

### चार पटीहून अधिक नवीन वाढीव मालमत्ताकर आला दीड पटींवर

### आ.सौ. सुलभाताई खोडके यांच्या सूचनेवरून गठीत झालेल्या समितीने दिला अहवाल

अमरावती :- अमरावती महानगर पालिकेने वर्ष २०२३-२०२४ पासून अंमलात आणलेल्या चारपटीने वाढीव नवीन मालमत्ता कर आकारणीतून शहरातील मालमत्ताधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या संदर्भात राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री ना.अजितदादा पवार यांच्या निर्देशानंतर मनपा आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीने नव्या कर मूल्यांकनाच्या कायदेशीर बाबी तपासून सुधारणा करून अहवाल मांडला. यावर मंगळवार दिनांक १२ मार्च २०२४ रोजी मुंबई मंत्रालय येथे झालेल्या बैठकीत उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांनी शिक्कामोर्तब केल्याने अमरावती महापालिकेने मालमत्ताधारकांना आकारलेली नवीन करवाढ कमी करण्याच्या निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे नवीन कर आकारणी नुसार मालमत्ताधारकांना जो चारपटीहून अधिक मालमत्ता कर भरावा लागणार होता, तो आता दीडपट भरावा लागणार आहे.




अमरावती शहरातील मालमत्ताधारकांना दिलासा देणारा निर्णय घेतल्या बद्दल अमरावती नगरीच्या आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांचे आभार मानीत अभिनंदन केले आहे. अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांचे सर्व्हेक्षण, कर निर्धारणाचे काम वर्ष २००५-२००६ मध्ये करण्यात आले. नंतर वर्ष २०२३ मध्ये महापालिका क्षेत्रातील मालमत्तांचे सर्व्हेक्षण करण्यात येऊन करयोग्य मूल्य निश्चित करण्या करिता सुधारित वार्षिक अपेक्षित भाडेदरानुसार सर्व प्रकारच्या मालमत्तांचे कर निर्धारण करण्यात येऊन प्रारूप कर निर्धारण यादी तयार करण्यात आली होती. तसेच सर्व्हेक्षणानंतर तसेच मालमत्ताधारकांना वैयक्तिक कर आकारणीच्या नोटीस वितरित करण्यात आल्या. मात्र नवीन कर सुधारणा व नविन आकारणी ही गतवर्षीच्या कर मुल्य निर्धारणाला अनुसरुन नसल्याने मालमत्ताधारकांना आलेले कर भाडे हे चार पटीहून अधिक असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला. याबाबत महापालिकेला अनेक आक्षेप देखील प्राप्त झाले होते. महापालिकेच्या वाढीव करातुन नागरिकांना आर्थिक भुर्दंड बसत असल्याने अनेक मालमत्ताधारकांनी अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई खोडके यांना निवेदन देऊन वाढीव कर आकारणीतून दिलासा देण्याची मागणी केली होती. या संदर्भात आ.सौ.सुलभाताई संजय खोडके यांनी गेल्या १६ ऑक्टोबर २०२३ रोजी महापालिकेत बैठक घेऊन नवीन वाढीव कर आकारणी संदर्भात सविस्तर आढावा घेतला. मागील अठरा वर्षात शहराचा झालेला विस्तार व वाढीव बांधकाम तसेच इंफ्रास्ट्रक्चर लक्षात घेता मनपाने ही सुधारीत कर आकारणी केली असली तरी सदर प्रक्रिया तांत्रिक दृष्ट्या गुंतागुंतीची व नियमानुरुप नसल्याचे स्पष्ट दिसत असल्याने मालमत्ताधारकांच्या आक्षेपांचे निराकरण होई पर्यंत नवीन कर निर्धारण नकोच अशी रोख ठोक भूमिका आमदार सौ.सुलभाताई संजय खोडके यांनी व्यक्त केली होती.

# पांढरी खानमपूर हिंसक आंदोलन प्रकरणी चौकशी समिती गठीत

## विभागीय आयुक्त डॉ. निधी पांडेय यांचे आदेश

अमरावती : विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रवेशव्दाराजवळ पांढरी खानमपूर येथील ग्रामस्थांच्या ठिय्या आंदोलनात जखमी झालेल्यांची विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी आज रेडियंट हॉस्पीटलला भेट देवून विचारपूस केली. जखमींना आवश्यक त्या सर्व वैद्यकीय सुविधा पुरवाव्यात, अशा सूचना त्यांनी रुग्णालयाला दिल्या. त्यांच्यासोबत पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी व आरोग्य अधिकारी उपस्थित होते. अंजनगाव सुर्जी तालुक्यातील पांढरी खानमपूर येथील प्रवेशव्दाराला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी अंजनगाव सुर्जी तालुक्यातील पांढरी खानमपूर येथील ग्रामस्थांचे गत तीन दिवसापासून विभागीय आयुक्त कार्यालयावर ठिय्या आंदोलन सुरु होते. काल सोमवारी (ता.१२ मार्च) सायंकाळी आंदोलनाला हिंसक वळण लागले. जिल्हा प्रशासनाचा संयुक्त बैठकीचा प्रस्ताव आंदोलकांनी अमान्य करुन जमावाने पोलिसांवर दगडफेक केली. आंदोलकांनी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या गेटचे नुकसान केले. पोलीस वाहनांची तोडफोड केली. त्यामुळे जमावाला पांगविण्यासाठी पोलीसांनी अश्रुधुरांच्या नळकांड्या फोडल्या, पाण्याचा मारा केला.



दरम्यान, नऊ पोलीस कर्मचारी, अग्निशमन दलाचे दोन जवान व पाच आंदोलक असे सोळाजण जखमी झाल्याची माहिती आहे. त्या जखमींची विभागीय आयुक्तांनी भेट घेऊन प्रकृतीविषयी आस्थेने विचारपूस केली. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी शहरात व विभागीय आयुक्त परिसरात पोलीस जवानांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. सद्यस्थितीत परिस्थिती पूर्णत: नियंत्रणात आहे. चौकशी समिती गठीत या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक सदस्यीय समिती गठीत करण्यात आली असून तीन दिवसात चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश विभागीय आयुक्तांनी समितीला दिले आहे.

# पोलीस पाटील, आशा स्वयंसेविकांच्या मानधनात भरीव वाढ, राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

मुंबई : पोलीस पाटलांच्या मानधनात भरीव वाढ करण्यात आली आहे. आता पोलीस पाटलांना महिन्याला १५ हजार रुपये मानधन देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. तसेच आशा स्वयंसेविकांच्या मानधनातही भरीव पाच हजार रुपयांची वाढ करण्याचेही सरकारने ठरवले आहे. अहमदनगर शहराचे नामकरण 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर' करण्यास आज बुधवारी राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या मंत्रिमंडळ बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेसह मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते.



राज्यातील आशा स्वयंसेविकांना राज्य शासनाच्या निधीतून दिल्या जाणाऱ्या ५ हजार रुपयांची वाढ करण्यास मान्यता देण्यात आली. मानधनातील ही वाढ नोव्हेंबर, २०२३ या महिन्यापासून देण्यात येईल. २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये नोव्हेंबर २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत वाढीव दराने मानधन देण्यासाठी आवश्यक असलेली २००.२१ कोटी इतक्या अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच ९६१.०८ कोटीच्या वार्षिक खर्चास राज्य सरकारने मान्यता दिली आहे.

### अहमदनगर शहराचे नामकरण अहिल्यानगर करण्यास मान्यता

अहमदनगर शहराचे तसेच जिल्ह्याचे नामकरण अहिल्यानगर करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. अहमदनगर शहराचे नाव बदलण्याची मागणी अनेक लोकप्रतिनिधी, नागरिक व संघटनांनी केली होती. या संदर्भात विभागीय आयुक्त, नाशिक यांच्याकडून माहिती मागविण्यात येऊन अहमदनगर महानगरपालिका प्रशासनाचा ठरावदेखील राज्य शासनास प्राप्त झाला होता. या अनुषंगाने गृह मंत्रालयाच्या सुधारित मार्गदर्शक तत्वानुसार हे नामकरण करण्याची शिफारस करण्यात आली असून केंद्राची मान्यता मिळाल्यानंतर अहमदनगर जिल्हा, तालुका तसेच महानगरपालिका यांच्या नामांतरणाची कार्यवाही महसूल व नगर विकास विभागाकडून करण्यात येणार आहे.

### मुंबईतील आठ रेल्वे स्थानकांची ब्रिटिशकालीन नावे बदलणार

मुंबईतील आठ रेल्वे स्थानकांची ब्रिटिशकालीन नावे बदलण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. करी रोड रेल्वे स्थानकाचे नाव लालबाग रेल्वे स्थानक, सॅन्डहर्स्ट रोड रेल्वे स्थानकाचे नाव डोंगरी रेल्वे स्थानक, मरीन लाईन्स रेल्वे स्थानकाचे नाव मुंबादेवी रेल्वे स्थानक, चर्नी रोड रेल्वे स्थानकाचे नाव गिरगाव रेल्वे स्थानक, कॉटन ग्रीन रेल्वे स्थानकाचे नाव काळाचौकी रेल्वे स्थानक, हार्बरवरील सॅन्डहर्स्ट रोड रेल्वे स्थानकाचे नाव डोंगरी रेल्वे स्थानक, डॉकीयार्ड रेल्वे स्थानकाचे नाव माझगाव रेल्वे स्थानक, किंग्ज सर्कल रेल्वे स्थानकाचे नाव तीर्थंकर पार्श्वनाथ रेल्वे स्थानक असे करण्यास मान्यता देण्यात आली.







काय करूं आतां धरूनिया भीड । नि:शंक हे तोंड वाजविले ।।
नव्हे जगीं कोणी । मुकीयांचा जाण सार्थक लाजून नव्हे हित ।।

कोणतीही चळवळ यशस्वी होण्यासाठी तिला वर्तमानपत्राची आवश्यकता असते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसेल तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणे होते. – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# सीएए; चर्चेचे मोहोळ उठले

*नागरिकत्व सुधारणा कायदा अर्थात सीएए लागू करण्याची अधिसूचना केंद्र सरकारने सोमवारी जारी केली आणि अपेक्षेनुरूप देशभर चर्चेचे मोहोळ उठले. खरे म्हटल्यास देशाच्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत एवढ्या तुटपुंज्या लोकांशी या कायद्याचा थेट संबंध आहे, की त्यावर गदारोळ होण्याचे काही कारणच नव्हते, देशाची लोकसंख्या १४० कोटींच्या घरात गेली आहे आणि जेमतेम १८ लाख लोकांचा या कायद्याशी थेट संबंध आहे. या वस्तुस्थितीकडे डोळेझाक करून जवळपास एक दशकापासून त्यावर काथ्याकूट सुरू आहे. डिसेंबर २०१९ मध्ये संसदेने हा कायदा पारित केल्यानंतर निर्माण झालेल्या प्रक्षोभादरम्यान, तर सुमारे ३० जणांना जीव गमवावा लागला होता. आताही त्याची पुनरावृत्ती होण्याच्या आशंकेने संवेदनशील भागांमध्ये अतिरिक्त बंदोबस्त तैनात करावा लागला आहे. त्यामागचे कारण म्हणजे, दोन्ही बाजूंनी सुरू असलेले राजकारण! मुळात विद्यमान सरकारने गत कार्यकाळात २०१६ मध्येच नागरिकत्व कायद्यात सुधारणा करण्याचे विधेयक संसदेत मांडले होते; पण राज्यसभेत सरकारच्या पाठीशी बहुमत नसल्याने ते बारगळले. नंतर सरकारने ते डिसेंबर २०१९ मध्ये पुन्हा मांडले. ते मंजूरही झाले; पण त्यानंतर कायदा लागू करण्यासंदर्भातील अधिसूचना जारी करण्यासाठी सरकारला तब्बल पाच वर्षे लागली आणि त्यानंतरही मुहूर्त कोणता सापडला, तर लोकसभा निवडणूक अगदी तोंडावर आली असतानाचा! त्यामुळेच सरकारच्या मनात काळेबेरे असल्याचा, तसेच सरकारने निवडणुकीवर डोळा ठेवून हा मुहूर्त शोधल्याचा आरोप करण्याची संधी विरोधकांना मिळाली, त्यामध्ये तथ्य असूही शकते; पण विरोधकही तर या मुद्द्यावरून राजकारणच करीत आहेत! मुस्लिमांचे नागरिकत्व हिरावून घेण्यासाठी किंवा त्यांना दुय्यम दर्जाचे नागरिक बनविण्यासाठी सरकारने हा कायदा केल्याचे वातावरण, विरोधक पार २०१६ पासूनच निर्माण करीत आहेत. मुळात सीएए नागरिकत्व देण्यासाठीचा कायदा आहे. नागरिकत्व काढून घेण्यासाठी त्यामध्ये कोणतीही तरतूद नाही. पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तान या तीन देशांमधील धार्मिक प्रतारणेमुळे त्या देशांमधून १९७१ ते २०14 दरम्यान जे हिंदू, बौध्द, ख्रिश्चन, पारसी अल्पसंख्याक भारतात निर्वासित म्हणून आले, त्यांना नागरिकत्व देण्यासाठी हा कायदा करण्यात आला आहे आणि अशा लोकांची संख्या जेमतेम १८ लाखांच्या घरात आहे. या कायद्यातून मुस्लिम समुदायास का वगळण्यात आले, हा विरोधकांचा आणखी एक आक्षेप आहे. सरकार धार्मिक आधारावर भेदभाव करीत असल्याचा आरोप ते करीत आहेत. मुळात हा कायदा केवळ तीन देशांमधून आलेल्या निर्वासितांसाठी आहे आणि ते तीनही देश केवळ मुस्लिमबहुलच नव्हे, तर घोषित मुस्लिम देश आहेत. त्यामुळे त्या देशांतील मुस्लिमांची धार्मिक आधारावर प्रतारणा होण्याचा प्रश्नच नाही. या मुद्द्याकडे दुर्लक्ष करून त्या देशांमधून भारतात आलेल्या सरसकट सगळ्यांना नागरिकत्व देण्याचा अर्थ घुसखोरीला मान्यता देणे, असा होईल! आश्रयाची अपेक्षा करणाऱ्या विदेशी नागरिकांची निर्वासित आणि घुसखोर अशी विभागणी करावीच लागणार आहे. बहुसंख्य निर्वासित अधिकृत मार्गाने देशात प्रवेश करून नंतर आश्रयाची मागणी करतात, तर घुसखोर अवैध मार्गांनी देशात प्रवेश करून लपूनछपून राहतात, बनावट कागदपत्रे तयार करतात, त्यांच्यात फरक करावाच लागणार आहे. या संदर्भात विद्यमान केंद्र सरकारवर जसा मतपेढी गोंजारण्याचा आरोप होतो, तसा तो काही विरोधी पक्षांवरही होतो. देशातील अल्पसंख्याक मुस्लिम समुदायास सरकारच्या विरोधात भडकवण्यासाठी काही विरोधी पक्ष वस्तुस्थितीकडे डोळेझाक करून त्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप सत्ताधारी पक्षही करीत आहे. या पार्श्वभूमीवर मुस्लिम समुदायातील सुजाण नेतृत्वानेच पुढे येऊन समाजाला वस्तुस्थितीची जाणीव करून देणे गरजेचे आहे. राजकारण उभय बाजूंनी होत आहे, पण आपण त्या राजकारणात न पडता, देशाच्या हिताच्या बाजूने उभे राहिले पाहिजे, अशी भूमिका सुजाण मुस्लिम नेतृत्वाने घेणे गरजेचे आहे. सुदैवाने तसे घडताना दिसत आहे. संवेदनशील बरेली जिल्ह्यातील मौलाना शहाबुद्दीन रिजवी यांनी, सीएएमुळे मुस्लिमांनी भयभीत होण्याची गरज नसल्याचे सांगत, कायद्याचे स्वागत केले आहे. दुसरीकडे केंद्र सरकारनेही सीएएसंदर्भातील मुस्लिम समुदायाच्या आशंकांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, विशेषतः सीएएपाठोपाठ एनआरसी आणिएनपीआरही लागू होणार असल्याच्या प्रचारासंदर्भात स्थिती स्पष्ट करायला हवी.*

# माळावरच्या रानवेली





***तो प्रचंड वटवृक्ष***
***कसा उन्मळून पडला***
***म्हणे त्याला बीलगलेला***
***सायलीचा वेल कुणीतरी खुडला***

याप्रमाणे वरून खंबीर दिसणारी, पुरुषाच्या पाठीशी प्रत्येक संकटात साथ देणारी एक वेलरुपी स्त्री असते. गावाकडच्या या रानवेली अगदी चिवट होऊन आपल्या फाटक्या संसाराला सांधण्याचे काम मनापासून करत असतात. कितीही एकर शेती असू दे पण ती यांच्या नावावर कधीच नसते. यांच्या नावावर असतात त्या शेतीचे कष्ट. शहरातल्या मातीत या वेली कधीच प्रफुल्लित राहत नाही. त्यांना हवी असते गावाकडच्या शिवाराची आपली माती. यांच्या आयुष्यात निवांतपणा नसला तरी वखवख ही नसते. पहाटेपासून रुंजी घालणाऱ्या या जणू ग्रामीण ओव्याचं म्हणाव्या लागतील. आयुष्यभर कष्टच वाट्याला आलेले आणि रोजचे उन्हातले काम.फोटोजेनिक असा यांचा चेहरा कधीच नसतो.

आयुष्यातील दुःखाचे काळे डाग यांच्या चेहऱ्यावर जागा मिळवतात, पण फेस क्रिम कशी असते ही यांना ठाऊक नसते. म्हणूनच छान दिसावंच असा काही यांचा हट्ट नसतो. उन्हात राहून काळपट झालेला रंग, पण तरतरीत नाक, चेहऱ्यावर वाढलेल्या सुरकुत्या आणि डोळ्यात कितीतरी न मोजता येणारे भाव. हेच यांचं साधं सुंदर रूप.कपाळावर रुपयाच्या आकाराचे ठसठशीत कुंकू आणि ते लावायचं ते ही किती मनापासून. त्यासाठी घरीच बनवलेला मेन. रानात धरलेल्या मोहळाच्या पोळ्यापासून स्वतः मन लावून मेन बनवून छोट्या डबीत भरून ठेवणार. आणि साज शृंगाराची ती छोटी लाकडी पेटी असून असून असणार तरी काय त्यात, एक जाड दाताची फनी, छानसा कुंकवाचा करंडा आणि मेनाची डबी. केसांची गाठ बांधून घातलेला अंबाडा . चेहऱ्यावर ही केसाला लावलेल्या तेलाचा हात फिरवला कि झाला यांचा मेकअप. बोटावर मेन घेऊन बऱ्याच वेळ एका दिशेने ते बोट कपाळावर गोल फिरवायचं. एकदा बेस् सेट झाला कि मग त्यावर कुंकू बोटाने पसरवायचं. ना कोणत्या भूमितीचा अभ्यास तरी ही अगदी अचूक गोल कुंकवाने कपाळावर रेखाटणार. नाजूक काठ असलेलं सुती लुगडं, असं कि लुगडं फाटेल पण काठ तरीही सुंदरच दिसतील. कधी कधी दोन लुगडयांना मध्येच जोडून म्हणजे दंड घालून केलेले लुगडं घालणं ही चैन नसायची तर गरज असायची. ज्याप्रमाणे दोन लुगडयांच्या तुकड्याला सांधून नवीन वस्त्र तयार व्हायचे तसेच त्यांना संसारात ही वेळोवेळी अनेक गोष्टी सांधायचे काम करावे लागायचे.अंगात छान अशी चोळी,ती ही खऱ्या खणाची. कमरेला सूती कापडापासून शिवलेली पिशवी अशी कि आजच्या भारीतल्या भारी पर्सला ही लाजवेल. तिच्यावर रिबनची छानशी झालर .त्या पिशवीत तीन चार कप्पे असणार आणि त्यातल्या कोणत्या कप्प्यात काय ठेवले याची अचूक माहिती त्या पिशवीच्या मालकिणीला असायची.सुट्टी नाणी,एखादा बिबा,आणि तपकिरीची डबी ही त्या पिशवीत असणारी धन दौलत.काळया मण्यातल्या मंगळसूत्राच्या दोन वाट्या म्हणजे तर यांचा जीव कि प्राण. झुपकेदार नथीची भारी हौस यांना .पण ती असावीच असा हट्ट मात्र अजिबात नाही.पायात मात्र वजनदार जोडवी घालणार. जोडा सुरक्षित राहावा ही त्या मागची भावना. हातात दोन दोन डझन बांगड्या.त्याचं यांना कधीच ओझं वाटत नाही.

आपली स्वप्ने आणि इच्छा मनात दाबून हसऱ्या चेहऱ्याने वावरणाऱ्या या रानवेली खळखळून हसणार त्या पाण्याच्या आडावर अथवा नदीकाठी आल्यावर. या जागा म्हणजे त्यांचे मन मोकळे करायच्या हक्काच्या जागा.

घरातल्या सगळ्यांच्या आधी त्यांचा दिवस सुरू होत असतो आणि संपणार मात्र सगळ्यांच्या नंतर. पहाटे उठून जात्यावर धान्य दळणे आणि ते ही आनंदाने ओव्या गात.

***माझी माहेरची वाट, कशी सवान ग वाटे***
***सासरच्या वाटेतले किती वेचावे ग काटे***

अशा ओव्यांमधून त्या आपल्या भावनांना वाट मोकळी करून देत असत. जात्यावरील दळणामुळे कधीच त्यांना मेंटेन राहण्यासाठी झुम्बा डान्स करण्याची गरज वाटली नाही.बाळंतपणही अगदी नॉर्मल आणि घरीच होणार. दळणकांडण करताना त्यांचा व्यायाम होत असे.यांच्या घरात कधीच हुंडाबळी होणार नाही.जे काही आहे ते पुरेस आहे या समग्र भावनेनेच त्या जगणार. म्हणूनच आपली सून आता आपली जागा घेणार म्हणून त्या त्रागा करणार नाहीत कि आकांड–तांडव करणार नाहीत.


नातू आणि अंगणात बांधलेली गुरं ढोरं या दोघांवरही सारखं प्रेम करणार . ते ही कृतीतून. फक्त शब्दातून नाही.सगळे शिवार आणि घरदार आपलं मानणार आणि त्यासाठी राबराब राबणार. एखादा अनोळखी वाटसरू जरी आला तरी हजारो प्रश्न विचारून त्याला भंडावून सोडण्यापेक्षा अगोदर त्याचे आदरातिथ्य करणार. अनोळखी माणसाला चोर समजणारी आपली शहरी संस्कृती तर चोरात ही माणूस पाहणारी अशी ही ग्रामीण संस्कृती. माणसांचा किती ही राबता असला तरी यांना थकण्याचा अधिकार नसतो. घरात कधीही आदळ आपट न करता सोशिकतेची परिसीमा यांच्यात नेहमी पाहायला मिळते. कष्ट आणि दुःख हे जणू यांच्या पाचवीला पुजलेले असले तरी ही चेहऱ्यावर मात्र ते त्या कधीच जाणवू देणार नाहीत.

***भाकरीचा पापडा करपत जावा***
***तशी करपत गेलीस माळरानात***

याच प्रमाणे सण, समारंभ, चालीरीती, रूढी परंपरा , नातेसंबंध, व्यसनाधिनता, अंधश्रद्धा अशा अनेक घटकातून या गावाकडच्या रानवेलीच्या वाट्याला दुःख येत असलं तरी ही येणाऱ्या प्रत्येक दुःखाला पायाखाली घेत नव्या उमेदीने ती संसाराचा गाडा ओढत असते.तिच्या तळहातावरच कृषी संस्कृतीची इमारत उभी असते आणि तिच्या श्रमाने शेत–शिवार हिरवे होते. मुले, माणसे आनंदी होतात.एका गावाच्या मातीत जनमलेल्या या रानवेली विवाहाच्या रूपात पुन्हा दुसऱ्या गावात रुजतात,संसारात झिझतात,आणि झिजता झिजता गावाच्या मातीतच विझतात.

शहराचे वारे यांना मानवत नाही,ना तिथली संस्कृती(सॉरी फॅशन).यांना शहरी भाषेत अडाणी म्हणून दुर्लक्षित केले असेल तरी खऱ्या अर्थाने यांच्यात एक ग्रंथ लपलेला असतो.जे तो वाचू शकत नाहीत ते खरी अडाणी.

वटवृक्षाच्या आधाराने वाढणाऱ्या या रानवेली वृक्षांना खंबीरपणे साथ देतात.माणुसकीचं नातं निभावतात आणि गावाकडच्या घरांना घरपण देतात.



– सुजाता नवनाथ पुरी
अहमदनगर
८४२१४२६३३७

# जिल्हा बँक शेतकऱ्यांकडून आता व्याज घेणार नाही

## बँकेचा निर्णय : अध्यक्ष बच्चू कडू यांची पत्रकार परिषदेत माहिती



अमरावती : जिल्हा बँकेच्या खातेदार शेतकऱ्यांना शासनाच्या एका आदेशावरून ३१ मार्चपर्यंत ६ टक्के व्याजाचा भरणा करण्याची सक्ती करण्यात आली होती. परंतु शेतकऱ्यांच्या अडचणी समजुन घेत ३१ मार्चपर्यंत बिनव्याजी रक्कम भरण्याचा निर्णय जिल्हा मध्यवर्ती बँकेने घेतला आहे, अशी माहिती बँकेचे अध्यक्ष बच्चु कडू, उपाध्यक्ष अभिजित ढपे यानंी बधु वारी (ता. १३) पत्रपरिषदेत दिली. वैयक्तीकस्तरावर हा निर्णय घेणारी महाराष्ट्रातील पहिलीच बँक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नियमित कर्जाचा भरणा करणाऱ्या खातेदार शेतकऱ्यांना यापूर्वी व्याज माफी योजनेअंतर्गत केवळ मुद्दल रक्कम बँकेत जमा करावी लागत होती तर या व्याजाची रक्कम शासनाकडून बँकेला प्राप्त व्हायची. परंतु ही व्याजाची रक्कम आता बकँ ेला न दते ा थटे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे आदेश शासनाकडून राज्यातील सर्वच जिल्हा बँकांना प्राप्त झाले होते. त्यामुळे शेतकऱ्यांकडून व्याज वसुल करण्याचा निर्णय बँकांनी घेतला. जिल्हा बँकेने देखील जिल्ह्यात याची अंमलबजावणी करीत शेतकऱ्यांना ६ टक्के व्याजाचा भरणा करण्याचे आवाहन केले. परंतु ही पध्दत अत्यंत अडचणीची होती. यामध्ये बँकेला शेतकऱ्यांकडून व्याजाची रक्कम घेणे होते तर ती रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात केव्हा जमा होईल, याची शोशती नव्हती. त्यामुळे जुनीच पध्दत कायम करण्याकरीता अध्यक्ष बच्चु कडू यांचा शासनस्तरावर पाठपुरावा सरूु के ला आहे. परत् व्याजासह रक्कम जमा करण्यामध्ये शेतकऱ्यांना अडचणीचे जात असल्याने शेतकऱ्यांचा विचार करीत ३१ मार्चपर्यंत कर्जाचा भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांकडून व्याज न घेण्याचा धाडसी निर्णय बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्या नेतृत्वात घेण्यात आला.


शासन जाे निणर्य दइे र्ल त्याची प्रतिक्षा न करता महाराष्ट्रात असा निणर्य घेणारी ही पहिलीच बँक असल्याचे यावेळी आ. बच्चु कडू म्हणाले. जर शासनाने शेतकऱ्यांच्या खात्यात व्याजाची रक्कम वळती के ली तर आम्ही ते व्याज शेतकऱ्यांकडून नंतर घेऊ परतुं आता शते कऱ्यानं ा त्रास हाऊे नये याकरीता हा धाडसी निर्णय घेतल्याचे अध्यक्ष बच्चु कडू यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला उपाध्यक्ष अभिजित ढेपे, संचालक नरेशचंद्र ठाकरे, सुनिल वऱ्हाडे, अजय मेहकरे, प्रशांत डहाणे, सीईओ राजेंद्र बकाल, प्रशासन अधिकारी संजय इंगळे उपस्थित होते.

# निवडणूकीत सत्ताधाऱ्यांना धडा शिकवू; प्रकल्पग्रस्तांची पत्रपरिषद



अमरावती: जिल्ह्यासह विभागातील प्रकल्प ग्रस्तांचे प्रश्न शासन स्तरावर प्रलंबित आहेत. २००६ ते २०१३ दरम्यान मोठ्या प्रमाणात सिंचन प्रकल्प उभारण्यात आले आहे. सन १७९४ चा भूसंपादन विधेयक अस्तित्वात असताना जून २००६ ला शासनाने साधे परिपत्रक निर्गमित करून सरळ खरेदी पद्धतीने खरेदी केली. त्यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय झाला आहे. या विरोधात निवेदने, आंदोलने केली. मात्र, आजवर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे प्रकल्प ग्रस्तांचा शासणाप्रती रोष व्यक्त करण्यात येत आहे. आगामी काळात होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत सत्ताधा?यांना त्यांची जागा दाखवून देऊ, असा इशारा विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त कृती संघर्ष समितीचे मनोज तायडे यांनी बुधवारी दुपारी झालेल्या पत्रपरिषदेतून दिला. आज खरेदीधारक शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला. विदर्भातील संपुर्ण प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांचे निराकरण करुन न्याय मिळण्यासाठी गेल्या दहा ते १२ वर्षापासुन सातत्याने विविध आंदोलने करीत आहोत. यामध्ये प्राणंतिक महाउपोषण, जनआक्रोश, ठिय्या, राहुटी, रास्ता रोको, भाकर आंदोलन व बैलबंडी मोर्चा आदींचा समावेश आहे. तमार्च-२०२२ अधिवेशन काळात विधानसभा व विधान परिषदेमध्ये प्रश्न उपस्थित करुन चर्चा घडवून आणली. शासन प्रशासनाने ओशासन देवून प्रकल्प ग्रस्तांच्या आशा पल्लवीत केल्या. त्यानंतर तत्कालीन सरकार जावून नविन सरकार स्थापन झाले. त्यानंतर आता विद्यमान सरकारला निवेदन व प्रत्यक्ष भेटी घेवून विदर्भातील शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा. याकरीता सातत्याने प्रयत्न करत आहोत. नागपूर अधिवेशनावर मोर्चाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. यावेळी सर्व समस्या निकाली लावून असे ओशासन दिले. मात्र, त्यानंतर पाठपुरावा करुन सुध्दा दुर्दैवाने शासन- प्रशासनातर्फे समिती शिष्टमंडळासमवेत बैठक आयोजित केली नाही. यावरुन शासनाचे प्रकल्पग्रस्तांप्रती उदासीन धोरण दिसून येत असल्याचे प्रकल्पग्रस्तांचें म्हणणे आहे. त्यामूळे आगामी लोकसभा निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना त्यांची जागा दाखवून देऊ असा इशारा विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त कृती संघर्ष समितीने दिला आहे. यावेळी पत्रपरिषदेला माणिकराव गंगावणे, साहेबराव विदळे, विकास राणे, विजय दुर्गे, उमाकांत आहिरराव, निलेश बनारसे, बाबुसिंग पवार, हरीचंद्र जाधव, डॉ. ओमप्रकाश कुटेमाटे, ज्ञानेशर जाधव, मनीषा चक्रनारायण , नरेंद्र पांडव, संतोष चक्रनारायण आदी उपस्थित होते.

# प्रिया देशमुख माध्यमिक विभागाच्या नवीन शिक्षणाधिकारी



अमरावती : अमरावती जिल्हा परिषदेच्या माध्यामिक शिक्षणाधिकारी म्हणून प्रिया देशमुख ह्या दिनांक १२ मार्च रोजी नव्याने रुजू झाल्या आहे. पूर्वी याच कार्यालयात उपशिक्षणाधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या प्रिया देशमुख यांची नुकतीच पदोन्नती झाल्याने प्रफुल्ल कचवे यांच्या जागेवर कामकाज पाहणार आहे. प्रिया देशमुख ह्या २०११ च्या गट शिक्षणाधिकारी/ उपशिक्षणाधिकारी बॅचच्या वर्ग दोन च्या अधिकारी असून यापूर्वी त्यांनी २०११ मध्ये नागपूर जिल्ह्यात गटशिक्षणाधिकारी म्हणून काम केले त्यानंतर २०१५ दरम्यान निरंतर उपशिक्षणाधिकारी नंतर अमरावती पंचायत समिती च्या गटशिक्षणाधिकारी म्हणून कामकाज पाहिले. २०१९ मध्ये काही वर्ष प्राथमिक विभागाच्या प्रभारी शिक्षणाधिकारी म्हणून त्यांनी आपल्या कामाची छाप सोडली. सध्यस्थितीत त्या माध्यमिक शिक्षण विभागात उपशिक्षणाधिकारी म्हणून पदभार सांभाळत होत्या. २६ फेब्रुवारीच्या शासन निर्णय नुसार त्यांची अमरावती जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारीपदी पदोन्नती मिळाली आहे. वाशिम जिल्ह्यातील जरुड येथील रहिवासी असलेल्या प्रिया देशमुख यांनी कारंजा तालुक्यातील एका खाजगी शाळेत शिक्षिका म्हणून सेवेला सुरुवात केली त्यानंतर अहमदनगर जिल्ह्यातील एका आश्रम शाळेत सेवा दिली. याचदरम्यान महाराष्ट्र राज्य पूर्व परीक्षेचा अभ्यास करत महाराष्ट्र शालेय शिक्षण विभागात गटशिक्षणाधिकारी पदाची परीक्षा उत्तीर्ण करत नागपूर येथून शासकीय अधिकारी सेवेला सुरुवात केली. आज त्यांनी शिक्षिका ते शिक्षणाधिकारी असा प्रेरणादायी प्रवास पूर्ण केला आहे. अमरावती जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रफुल्ल कचवे यांचे नागपूर मनपा शिक्षणाधिकारी येथे स्थानांतर झाले आहे. लवकरच ते नागपूर येथील शिक्षणाधिकारी पदाचा पदभार सांभाळणार आहे.

## मामा-भाच्यांच्या मारहाणीत जखमी वृद्धाचा मृत्यू, आरोपींना अटक

जरूड : किरकोळ भांडणावरून मामा भाच्यांनी जबर मारहाण केल्याने शेजारी राहणाऱ्या मिलिंद साहेबराव अलोने या ६० वर्षीय व्यक्तीचा उपचारादरम्यान १२ मार्चच्या रात्री मृत्यू झाला. मारहाणीची घटना २७ फेब्रुवारी रोजी जरूड येथे घडली. याप्रकरणी आरोपीला अटक करण्यात आली आहे.

पोलिस सूत्रांनुसार, मृत मिलिंद अलोने आणि पोलिस विभागात होमगार्ड म्हणून कार्यरत आरोपी केशव चंपत सातपुते (५२) या शेजाऱ्यांमध्ये जुने वैमनस्य आहे. घटनेच्या दिवशी केशव हा अंघोळ करीत असताना मिलिंद अलोने हे रस्त्याने जात होते. तू मला अंघोळ करताना का पाहतोस, असे म्हणत केशवने शिवीगाळ करीत

मिलिंद अलोने यांना मारहाण सुरू केली. लगेच तेथे त्याचे भाचे अंकित बारमासे (२४) व चेतन बारमासे (२२) हे हातात सेटिंगचे राफ्टर घेऊन आले आणि त्यांनीही मिलिंद अलोने यांना जबर मारहाण केली. डाव्या कुशीवर व डोक्यावर मारल्याने डोक्यातून रक्त निघाले. यामुळे त्यांना नागपूर येथील एम्समध्ये दाखल करण्यात आले. अखेर १४ दिवसांनी १२ मार्चच्या रात्री मिलिंद अलोने यांची प्राणज्योत मालवली.

# पेसा संवर्गातील पदभरती करून नियुक्तीपत्र द्या; युवक धडकले



परतवाडा : पेसा क्षेत्रातील १७ संवर्ग पदभरतीवर सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित याचिकेच्या अधीन राहून आदिवासी उमेदवारांना शासनाच्या विविध विभागांमार्फत निघालेल्या नोकर भरतीत परीक्षा देण्यासह ज्यांनी परीक्षा दिल्या, त्यांना नियुक्तीपत्र देण्याची मागणी आदिवासी युवकांनी मेळघाटचे आमदार राजकुमार पटेल यांना केली. दस्तुरखुद्द शासनाने समिती नेमून तसा निर्णय घेतला व त्यानंतर शासनाला याचा विसर पडल्याचा आरोपही या सुशिक्षित आदिवासी बेरोजगार युवकांनी केला आहे.राज्यभरातील आदिवासी क्षेत्रात पेसा कायदा लागू आहे. मेळघाटातील आदिवासी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सुशिक्षित बेरोजगार युवक-युवती असून, त्यांच्या भविष्याचा विचार करून भरतीवर तोडगा काढण्याबाबत त्यांनी आमदारांना निवेदन दिले. शासनाच्या विविध विभागांकड़न मेगाभरती होत आहे. त्यासाठी परीक्षा, मुलाखती सुरू असताना, आदिवासी लोकांना वंचित ठेवण्याचा हा प्रकार आहे. चार महिन्यांपूर्वी आदिवासी आमदारांची बैठक बोलावून न्यायालयात प्रलंबित याचिकेला अधीन राहून आदिवासी युवक-युवतींची शासकीय सेवेत नियमाने परीक्षा व ज्यांनी परीक्षा दिली आहे, त्यांना नियुक्तीपत्र देण्याचा निर्णय झाला. त्यावर अंमलबजावणी होत नसल्याने अनेक आदिवासी यवती व यवकांना वयोमर्यादा ओलांडण्याची भीती आहे. त्यामुळे यावर तत्काळ तोडगा काढून युक्तीपत्राच्या कार्यवाहीसाठी पुढाकार घेण्याची मागणी आ. राजकुमार पटेल यांच्याकडे वैष्णवी मावसकर, निशा पटोकर, प्रतीक्षा कासदेकर, प्रतिभा धिकार, शिवा झामरकर, गौरव पटेल, पवन साकोम, रमेश पटोरकर, रितेश भिलावेकर यांच्यासह मेळघाटातील शेकडो सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींनी केली आहे.

# मध्यरात्री महिलेच्या घराला लावली आग

अमरावती : एका माथेफिरू बेवडयाने मध्यरात्री महिला घरात कुटूंबासह झोपली असताना तिच्या घराच्या प्रवेशव्दाराला आग लावली. घरात धुर दाटल्याने महिलेला जाग आल्यानंतर तिने तातडीने आग विझविली. त्याच बेवड्याने पहाटे महिलेला जातीवाचक शिविगाळ सुध्दा केली. खोलापुर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वाठोडा शुल्केश्वर गावात ही घटना घडली असून पोलिसांनी आरोपीला अटक केली. निवृत्ती श्रीकृष्ण मानकर (४०) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. निवृत्ती हा नेहमीच तक्रारकर्त्या महिला व तिच्या कुटूबींयातील सदस्यांसोबत वाद करतो. याच वादातून अनेकवेळा त्यांच्या हाणामाजया सुध्दा झाल्या आहेत. अशातच ११ मार्चला सायंकाळी निवृत्तीने महिलेसोबत वाद घालून तिला शिविगाळ केली. महिलेने सुध्दा त्याची खाल्लीपिल्ली काढून घरात गेली. अशातच मध्यरात्री १२ वाजताच्या सुमारास घरात धुर कोंडल्याने महिलेला जाग आली. दरवाज्यातून धुर येत असल्याने महिलेने दार उघडले असता दाराला लाग लागलेली दिसली आणि आरोपी निवृत्ती जोरजोराने शिविगाळ करतांना दिसली. महिलेसह तिच्या घरातील इतर सदस्यांनी तातडीने पाणी टाकून आग विझविली. ही घटना घडताच संपूर्ण गावात खळबळ उडाली. अशातच निवृत्तीने पहाटे ६ वाजता पुन्हा महिलेच्या घरासमोर येऊन तिला जातीवाचक शिविगाळ केली. याबाबत महिलेची तक्रार येताच खोलापुर पोलिसांनी तातडीने गुन्हे दाखल करून निवृत्तीला अटक केली. याबाबत पोलीस पुढील तपास करित आहेत.

# शेफाली जरीवाला पुन्हा चर्चेत



*बरीच सेलिब्रिटी मंडळी सार्वजनिक ठिकाणी बिनधास्तपणे जोडीदारावर असणारं आपलं प्रेम व्यक्त करताना दिसतात. या मंडळींचे व्हिडीओ व फोटोही सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरतात. कलाक्षेत्रामधील अशाच एका जोडप्याच्या व्हिडीओची सध्या सोशल मीडियावर जोरदार चर्चा रंगताना दिसत आहे. शेफाली जरीवाला आणि तिचा पती पराग यांचा लिपलॉक करतानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे.*

*शेफाली जरीवाला मुंबई विमानतळावर स्पॉट झाली होती. तिचा नवरा पराग त्यागी तिला सोडण्यासाठी आला होता. पापाराझींसमोर दोघांनी एकमेकांना लिप किस केलं ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. यानंतर, जेव्हा पापाराझींनी त्यांना पुन्हा असे करण्यास सांगितले तेव्हा दोघांनीही हसत-हसत पुन्हा एकमेकांच्या ओठांचे चुंबन घेतले.काही लोकांना शेफाली आणि परागचे हे वर्तन आवडलेले नाही. काहींनी हा सगळा दिखावा असल्याचे सांगितले तर काहींनी ही नाटकं घरी दाखवायची असं कॉमेंट करत टोमणा मारला आहे. एका युझरने त्यांना आता इथे गादी आणि अंथरूणदेखील आणून द्या. असं कॉमेंटमध्ये लिहिलं आहे. तर एका युझरने लिहिलं, अभिनेते आणि अभिनेत्रींपेक्षा आणखी चीप कुणीच नाहीये या जगात. एकूणच शेफाली आणि पराग यांच्या या कृतीवर सगळेच टीका करताना दिसत आहेत.शेफालीला ९० च्या दशकात आणि नंतरही 'कांटा लगा' या गाण्याने खूप प्रसिद्धी मिळाली, पण त्यानंतर ती लाईमलाइटपासून दूर गेली. 'बिग बॉस १३' या रिलिटी शोमध्ये सहभागी झाल्यानंतर ती पुन्हा चर्चेत आली. शेफालीने २००४ मध्ये संगीतकार हरमीत सिंगशी लग्न केले, पण २००९ मध्ये त्यांचा घटस्फोट झाला. यानंतर तिने २०१५ मध्ये पराग त्यागीशी लग्नगाठ बांधली. दोघांनाही अद्याप मूलबाळ नाही. मीडिया रीपोर्टनुसार दोघेही लवकरच मूल दत्तक घेणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.*

# मराठी भाषा धोरणास मंत्रिमंडळाची मंजूरी

मुंबई – मराठी भाषेचे जतन, संवर्धन, प्रचार, प्रसार व विकास होण्याच्या अनुषंगाने केवळ शिक्षणाचेच नव्हे तर सर्व लोकव्यवहाराचे जास्तीत जास्त मराठीकरण होणे आवश्यक आहे, त्यासाठी संवाद, संपर्क आणि सर्व स्तरावरील व्यवहारासाठी मराठी भाषेचा वापर करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने व्यवहारक्षेत्रनिहाय शिफारसी अंतर्भूत करून मराठी भाषा धोरण तयार करण्यात आले असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत या धोरणाला मान्यता देण्यात आल्याची माहिती शालेय शिक्षण आणि मराठी भाषा विभागाचे मंत्री दीपक केसरकर यांनी दिली.आगामी २५ वर्षामध्ये मराठी भाषा ज्ञान व रोजगाराची भाषा म्हणून प्रस्थापित करणे, विज्ञान–तंत्रज्ञान, वैद्यक अशा विविध ज्ञानशाखांमधील उच्च शिक्षण मराठी माध्यमात उपलब्ध करुन देणे, मराठी भाषेला नवतंत्रज्ञानाने सुसज्ज करणे, सर्वसामान्यांना समजेल अशी प्रशासकीय व्यवहाराची मराठी भाषा विकसित करणे, बोली भाषांचे जतन व संवर्धन तसेच मराठी भाषेला राष्ट्रीय व वैश्विक स्तरावर महत्वाची भाषा म्हणून प्रस्थापित करणे इत्यादी उद्दिष्टे साध्य करण्याच्या अनुषंगाने मराठी भाषा धोरणामध्ये शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, संगणकीय शिक्षण, विधी व न्याय व्यवहार, वित्त व उद्योगजगत, प्रसारमाध्यमे इ. व्यवहारक्षेत्र निहाय सविस्तर शिफारसी करण्यात आल्या असल्याचे मंत्री श्री.केसरकर यांनी सांगितले.सर्व माध्यमाच्या पूर्वप्राथमिक शिक्षण व नर्सरी शिक्षणाच्या अभ्यासक्रमात मराठी अक्षरओळख या अभ्यासक्रमाचा अंतर्भाव करण्यात येईल.पीएच.डी. करीता मराठी भाषाविषयक संशोधन करणाऱ्या विद्यार्थी व मार्गदर्शक यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येईल. तथापि, एका विषयाकरिता एकदाच अनुदान देय असेल.राज्यातील विविध बोलीभाषांचा प्रमाण मराठी भाषेत अनुवाद करण्याच्या अनुषंगाने आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सुलभ उपयोजके विकसित करण्यात येतील.

# सत्तेत आल्यास राहुल गांधी काढणार देशाचा 'एक्स रे'

## नंदुरबारच्या सभेत केली 'ही' मोठी घोषणा




नंदुरबार : काँग्रेस पक्ष हा आदिवासींना आदिवासी मानतो तर भाजपा आदिवासींना वनवासी मानतात. कारण जोपर्यंत वन किंवा जंगल आहेत तोपर्यंतच वनवासी राहतील आणि देशातील सर्व जंगले हे अडानींच्या प्रकल्पांना दिले जात आहे. त्यामुळे आदिवासींच्या अस्तित्वाला धोका आहे. यासाठी आगामी लोकसभा निवडणुकीत काँग्रेसची सत्ता आली तर प्रथम जातनिहाय जनजगणा, आर्थिक सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे. यावरुन कोण किती मागास आहे आणि कोणाचा किती वाटा हवा याचा एक्स रे तयार होईल, असे प्रतिपादन काँग्रेसचे खा.राहूल गांधी यांनी केले.

भारत जोडो तथा आदिवासी न्याय यात्रेनिमित्त काँग्रेसचे खा.राहूल गांधी यांनी आज नंदुरबारला भेट दिली. त्याप्रसंगी शहरातील सी.बी. पेट्रोल पंपाजवळील मैदानावर आयोजित सभेत ते बोलत होते. या सभेसाठी १३५ बाय ३०० क्षेत्रात सुमारे ३४५ स्के. फूट जागेवर मंडप टाकण्यात आला होता. या मंडपाची क्षमता सुमारे १२ हजार लोक असतील अशी असून सभेला १८ ते २० हजाराचा जनसमुदाय उपस्थित राहील, असा पक्षाच्या नेत्यांचा अंदाज होता. आज प्रत्यक्ष सभेला दहा हजाराहून अधिक लोक उपस्थित राहिले. यावेळी व्यासपिठावर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश, बी.एम.संदीप, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, प्रणिती शिंदे, आ.ॲड.के.सी.पाडवी, आ.शिरीष नाईक, अमित चावडा, सत्यसिंह गोयल, शिवाजीराव मोघे, प्रतिभा शिंदे, चंद्रकांत हंडोरे आदी उपस्थित होते. आदिवासींची परंपरागतरीत्या होळी साजरी करण्याची इकडे प्रथा आहे. आधी मानाची होळी पेटते आणि नंतर गावोगावच्या होलिकोत्सवाचा प्रारंभ केला जातो तथापि आदिवासी न्याय यात्रा घेऊन राहुल गांधी यांचे आगमन झाल्याचे औचित्य साधून माजी मंत्री के सी पाडवी यांनी थेट सभेच्या मैदानावर मानतेच्या होळीचे आयोजन केले आणि स्वतः राहुल गांधी यांच्या हस्ते पेटवून आदिवासींच्या होलिकोत्सवाचा प्रारंभ करण्यात आला. सर्व उपस्थित प्रमुख नेत्यांनी त्याप्रसंगी होळीच्या भोवती घेर धरला.

# भाजपच्या दुसऱ्या यादीतील पाच महिला उमेदवारांची नावे चर्चेत







नवी दिल्ली : भाजपने लोकसभा निवडणुकीसाठी आज (दि.१३) दुसरी यादी जाहीर केली. आजच्या या दुर्सय़ा यादीत अनेक नवीन चेहरे पहायला मिळाले आहेत. या महिला उमेदवार चेर्हय़ांमुळे भाजपची दुसरी यादी चर्चेत आली आहे.

मागच्या आठवड्यात लोकसभेची पहिली यादी जाहीर केली होती, त्यात महाराष्ट्रातून एकाही उमेदवाराचे नाव नव्हते. पण दुस–या यादीत महाराष्ट्रातील २० उमेदवारांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये महिला उमेदवारांची नावे पहायला मिळाली आहेत. विशेष म्हणजे ही पाचही नावे महिला उमेदवारांची आहेत. हिना गावित, स्मिता वाघ रक्षा खडसे, भारती पवार, पंकजा मुंडे अशी या पाच महिला उमेदवारांची नावे आहेत.

नितीन गडकरी (नागपूर), रक्षा खडसे (रावेर), मुरलीधर मोहोळ (पुणे), पंकजा मुंडे (बीड), सुजय विखे–पाटील (अहमदनगर), सुधीर मुनगंटीवार (चंद्रपूर), भारती पवार (दिंडोरी), अनुप धोत्रे (अकोला), रावसाहेब दानवे (जालना), सुभाष भामरे (धुळे), प्रताप पाटील–चिखलीकर (नांदेड), संजयकाका पाटील (सांगली), रणजीत निंबाळकर (माढा), पियुष गोयल (उत्तर मुंबई), मिहीर कोटेचा (उत्तर पूर्व), सुधाकर श्रृंगारे (लातूर), स्मिता वाघ (जळगाव), कपिल पाटील (भिवंडी), रामदास तडस (वर्धा), डॉ. हिना गावित (नंदुरबार).

# नांदगाव खंडेश्वर पंचायत समिती अमृत महाआवास अभियान ४.० मध्ये प्रथम

## पालकमंत्र्यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण



नांदगाव खंडेश्वर : अमृत महाआवास अभियान ४.० अंतर्गत सन २०२२–२३ मध्ये अमरावती जिल्ह्यामधून १४ तालुक्यांनी भाग घेतला होता. यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना, ग्रामीण रमाई आवास योजना, ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत योजनेमध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये नांदगव खंडेश्वर पंचायत समितीने उत्कृष्ट कामगिरी बजाविल्याने या पंचायत समितीला प्रथम पुरस्कार देण्यात आला.

या योजनेत प्रामुख्याने घरकुल बांधकामा करीता मालकीची जागा नसलेल्या भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणे असे एकूण १८६० लाभार्थी नांदगाव खंडेश्वर तालुक्यात होते. या सर्वच लाभार्थ्यांना घरकुल बांधकामा करीता ५०० चौरस फुटाच्या मर्यादित मोफत जागा उपलब्ध करून देण्यात आली. तसेच त्यांना घरकुल मंजूर करण्यात असून घरकुल पूर्ण करण्याची टक्केवारी ८५ टक्के आहे. पात्र लाभार्थ्यांचा प्रस्ताव ग्रामपंचायतीकडून तयार करून घेऊन मंजूर करणे,प्रथम हप्ता वितरित करणे व विहित कालावधीत घरकुल पूर्ण करणे यामध्ये नांदगाव खंडेश्वर पंचायत समितीने उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे ९ मार्च रोजी सायन्सकोर मैदान अमरावती येथे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते पुरस्कार वितरित करण्यात आला. यावेळी खा. अनिल बोंडे, आ. प्रवीण पोटे आ. रवी राणा, विभागीय आयुक्त निधी पांडेय, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा यांची उपस्थिती होती. सदर पुरस्काराचे श्रेय तत्कालीन गटविकास अधिकारी प्रकाश नाटकर, सहाय्यक गटविकास अधिकारी संजय झंझाड व तालुक्यातील ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक संघटनेच्या पदाधिकारी यांना देण्यात आले. सदर कार्यक्रमाला पंचायत समितीचे प्रभारी गटविकास अधिकारी संजय झंझाड, कनिष्ठ अभियंता प्रतीक दांडगे, विस्तार अधिकारी विठ्ठल जाधव, सुनील खेडेकर, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक विजय आळणे, निलेश खडसे, डाटा एन्ट्री ऑपरेटर मनीष मदनकर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता हितेश लांडे, खुशाल कापसे, विकी रत्नपारखी, अक्षता जळीत, वैष्णवी देशमुख हे उपस्थित होते.

# प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलनाची बैठक



चांदूर रेल्वे : हुतात्मा स्मारक जवळ प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलनाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत दिव्यांग व्यक्तींचे हक्क आणि त्यांच्यासाठी असणाजया शासनाच्या योजनांबद्दल माहिती देण्यात आली. बैठकीत प्रहार क्रांती आंदोलन चांदूर रेल्वेच्या तालुका अध्यक्षपदी अक्षय वासनकर व सचिन इमले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. नियुक्तीचे पत्र श्यामभाऊ राजपूत (जिल्हाप्रमुख) व शहरप्रमुख प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलन अमरावती यांच्या हस्ते देण्यात आले. या बैठकीला बळवंत नागने, सुरेश गावंडे, अनिल वाढोनकर, सुधीर सावरकर, महेश बडगुले, प्रवीण डोंगरे, अनिल खेरडे, रमेश गिलबिले, अक्षय वासनकर व सचिन इमले उपस्थित होते.






# नेहरू युवा केंद्राची जिल्हास्तरीय युवा संसद उत्साहात

अमरावती : नेहरू युवा केंद्र अमरावती, युवा कार्यक्रम एवं क्रीडा मंत्रालयातर्फे जिल्हास्तरीय युवा संसद मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयात नुकतीच पार पडली. मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख या अध्यक्षस्थानी होत्या. प्रमुख उद्घाटक म्हणून खासदार डॉ. अनिल बोंडे उपस्थित होते. त्यांनी युवकांना मतदानाचे महत्त्व पटवून दिले त्याचसोबत त्यांनी सुज्ञ नागरिक म्हणून मतदानाचा हक्क बजावा, असे आवाहन केले. संवेदनशील विवेकवादी समाज निर्माण करण्याची जबाबदारी युवकांवर आह. नहे रू यवु I कें द्र एक उत्तम व्यासपीठ असल्याचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी सांगितले. युवा संसदेला मुख्य मार्गदर्शक म्हणून प्रा.डॉ.प्रशांत विघे, प्रा.सूरज हेरे आणि सुबोध धुरंधर हे उपस्थित होते. प्रा. डॉ. प्रशांत विघे यांनी वोकल फोर लोकल या विषयावर माहिती दिली. प्रा. सुरज हेरे यांनी भारतातील नवीन उपक्रम आणि योजनांबद्दल माहिती दिली. युवकांना संसदीय कार्यप्रणालीची ओळख व्हावी, या उद्देशाने अभिरूप युवा संसदेचे सादरीकरण करण्यात आले. जिल्हा युवा अधिकारी स्नेहल बासुतकर यांनी प्रास्ताविक तर भाग्यश्री कांबळे यांनी सूत्रसंचालन केले.






गौरव प्रकाशन वृत्तपत्र मालक, प्रकाशक, संपादक – बंडूकुमार श्रीरामजी धवणे यांनी मुद्रक गौरव बं. धवणे यांच्या अनुश्री ग्राफीक्स, चपराशीपुरा अमरावती येथे मुद्रीत करून गजानन नगर नं. १, नवीन बायपास रोड, अमरावती अमरावती–६,येथे प्रकाशित केले. मो. ९९६०२२५२७५ या पत्रातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (कोणताही वाद अमरावती न्याय कक्षेत) Email: gauravprakashan1@gmail.com., Website : www.gauravprakashan.com (HARD COPY-B/W, PDF- COLOUR)